# <u>एका नास्तिकाचे कथन</u>

देवा नाही आलो मी देवळात तुला भेटायला
मन:शांती मिळेल का इथे आलो पहायला-

नाही माझे नमन तुला, ए पाषाणाच्या देवा
कर जुळविला जिने, ती आहे मूर्तिकाराची कला-

नाही टेकले डोके माझे तुझ्या पाऊली देवा
झालो नतमस्तक मी पाहून पुजाऱ्याची सेवा-

नाही दिसत जगात कुठेही सारी कडे शोधले देवा
तरी सारे मानतात म्हणून वाटतो तुझा हेवा-